**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

**परिपत्रक -** जा.क्रमांक :- विकाअ/आस्था/पदनाम/२०१८/ 208
**महत्वाचे -** दिनांक :- 22 JAN 2018

**प्रति,**

प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,अमरावती/
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,अमरावती/
शासकीय तंत्र निकेतन,अमरावती /यवतमाळ/खामगांव/वाशीम/मुर्तीजापूर/अचलपूर,
प्राचार्य,शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,यवतमाळ.
प्राचार्य, डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती/
प्राचार्य, गीतादेवी खंडेलवाल ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, अकोला.

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयागामार्फत आयोजित परिक्षांकरीता शाळा /महाविद्यालय उपलब्ध करुन , देण्याबाबत.**

**संदर्भ :-** तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र.: २/एनजीसी/संकीर्ण-२५/२०१७/१३१२, दि. २०/१२/२०१७

या परिपत्रकान्वये आपणांस आदेशित करण्यात येत आहे की, सोबत संलग्न केलेले उक्त संदर्भांकीत परिपत्रकाचे अवलोकन करुन त्यात दिलेल्या निर्देशाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परिक्षांकरीता वेळोवेळी शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देण्यात यावीत.

**सोबत-** संदर्भांकीत परिपत्रक.

**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**अमरावती**

**प्रत -**

१. **मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरीता सादर.**
२. **प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्याकरीता.**

E:\Raut\Paripatrak 2017.doc

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्र :- २/एनजीसी/संकीर्ण-२५/२०१७/ ९३९२
दिनांक : 20 DEC 2017

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र,
हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापनशासत्र
पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता शाळा / महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र:८६(१)/२०१२/तीन, दि.१२.१२.२०१७
२. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१२/आस्था(२)/सेवा/२०१२/४१०, दि.१.०२.२०१३ व क्र. १२/आस्था(२)/सेवा/२०१२/७५६, दि.९.०३.२०१५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, शासन सेवेतील विविध पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षांचे आयोजन करण्यात येते. सदर परीक्षेकरीता परीक्षा केंद्र निश्चित करण्याकरीता आयोगाच्या मागणीनुसार कॉलेजांची उपलब्धता करुन देण्याबाबत संदर्भ क्र. २ च्या पत्रांन्वये सूचना जारी करण्यात आल्या आहेत. मात्र, काही संस्था परिक्षेच्या आयोजनाकरीता सहकार्य करीत नसल्याबाबतची बाब आयोगाने संदर्भाधीन पत्रान्वये निदर्शनास आणली आहे.

आयोगामार्फत परीक्षांचे आयोजन हे शक्यतो सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी केले जाते. सदर परीक्षांकरीता महाविद्यालयांमधील फक्त वर्गखोल्यांची आवश्यकता असते. परीक्षांचा कालावधीही फक्त काही तासांचा असतो. परीक्षेकरीता प्रयोगशाळांचा वापर करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना आयोगाकडुन निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार सेवाशुल्क (प्रति उमेदवार रु. ८/-प्रमाणे) अदा केले जाते.

या परिपत्रकान्वये आपणांस आदेशित करण्यात येत आहे की, आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता आयोगाच्या अथवा संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीनुसार महाविद्यालये उपलब्ध करुन देण्यात यावीत. आयोगाच्या परिक्षांचे आयोजन ही संवेदनशिल व अत्यावश्यक बाब आहे. त्याकरीता आपणांकडुन संबंधित यंत्रणेस सहकार्य होणे गरजेचे आहे.

तसेच परीक्षेचे आयोजन ही अत्यावश्यक शासनसेवा असल्याने प्रचलित कायद्यातील तरतुदीचा वापर करुन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संबंधित महाविद्यालयाचे आयोगामार्फत आयोजित परीक्षांसाठी अधिग्रहण करण्यात येईल, आयोगाच्या अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीनुसार महाविद्यालय उपलब्ध करुन

देण्यास नकार दिल्यास सदर बाबीची गंभीर दखल घेण्यात येईल, असे आयोगाने संदर्भाधीन पत्रात नमुद केले आहे. (प्रत सोबत जोडली आहे). त्यानुसार सर्व संस्थांना असे कळविण्यात येते की, आयोगाच्या परिक्षेच्या मागणीनुसार परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्यात यावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता सादर.
२. मा. उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कूपरेज, मुंबई ४०० ०२१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर यांना अधिपत्याखालील संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणून देण्याकरीता.
४. कार्यासन अधिकारी, का.क्र.१०, १२ तंत्रशिक्षण मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहितीकरीता.
५. कार्यासन अधिकारी, का.क्र.३ तंत्रशिक्षण मुख्य कार्यालय, मुंबई यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता अग्रेषीत.
६. निवडनस्ती कार्यासन क्र. २.